# B.A. Part–I (Semester—II) Examination

## (Literature of Modern Language)

## MARATHI LITERATURE

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** एकूण **पाच** प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

(अ) अरे, ऐपत कुठे होती माझी मोलकरीण आणि गडी ठेवायची ? हीच मग बाळंतपणानंतर चवथ्या व पाचव्या दिवशी कामाला लागायची.

**किंवा**

मला माहीत होतं, तुम्ही माझ्याशिवाय राहू शकणार नाही. म्हणून माझ्या कपड्यांबरोबर तुमचेही कपडे भरलेयत मी बॅगेत !

(ब) "एका ठरावीक वयानंतर प्रत्येक स्त्रीला-ती नोकरी करणारी असो किंवा नसो-रिटायर होण्याचा हक्क आहे..."

**किंवा**

"समाजाने स्त्रीला वेगवेगळी लेबलं लावून कर्तव्याच्या नावाखाली तिच्याकडून फक्त सेवा करून घेतलीय."

(क) माझियासाठी जगाचे
रोज जाते घर्घरावे;
मात्र मी सोशीन जे जे
ते जनाईचे असावे !

**किंवा**

"इतिहास नाही सांडणाऱ्या रक्तात तो वाहतोय एखाद्या जिवंत नसेतून."

(ड) मी येतो तेव्हा तुमच्या
तोंडाचे पळते पाणी
नभ डोळयामधले तुमच्या
जीव देते हैराणूनी.

**किंवा**

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे ! 16

2. 'आई रिटायर होतेय' या नाटकाचा आशय तुमच्या शब्दात रेखाटा.

**किंवा**

आईचे (सुधाताई) स्वभावचित्र रेखाटा. 16

3. (अ) विणाचे स्वभावचित्र रेखाटा.

**किंवा**

आईच्या त्यागाचे महत्व 'आई रिटायर होतेय' या नाटकाच्या आधारे स्पष्ट करा. 8

(ब) मंदारचे स्वभावचित्र रेखाटा.

**किंवा**

'आई रिटायर होतेय' या नाटकाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा. 8

4. (अ) धर्मसत्ता व राजसत्ता विरुद्धतेच्या विषमतेची विद्रोहात्मक जाणीव ना.धो. महानोरांच्या कवितेतून कशी व्यक्त होते ?

**किंवा**

'बाय आणि गाय' या कवितेत कवयित्रीने स्त्रीच्या शोषणाचे चित्रण कसे केले आहे ? 8

(ब) सुरेश भट यांच्या कवितेतील आशय सौंदर्य स्पष्ट करा.

**किंवा**

खालीलपैकी **एका** कवितेचे रसग्रहण करा :

(1) हरवले जेथे ज्ञानदेव तुकाराम

(2) मानूस

(3) गोंगलू. 8

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नातील अचूक उत्तर निवडा :

(1) 'आई रिटायर होतेय' या नाटकाचे लेखक कोण ?

(अ) अशोक पवार (आ) अशोक कांबळे

(इ) अशोक पाटोळे (ई) अशोक थोरात

(2) निरोप समारंभाच्या वेळी पप्पांना ऑफीसमध्ये कोणती वस्तू भेट मिळाली ?

(अ) घडयाळ (आ) टेबललॅम्प

(इ) कपाट (ई) बॅग

(3) नंदनच्या पत्नीचे नाव काय होते ?

(अ) शुभ्रा (आ) वीणा

(इ) नेत्रा (ई) सुधा

(4) नेत्रा आपल्या सासुला कोणत्या विषयाचे पेपर तपासायला सांगते ?

(अ) भूगोल (आ) इतिहास

(इ) गणित (ई) इंग्रजी

(5) आईची (सुधाताईची) आणि मुकुंद फाटक यांची भेट किती वर्षानंतर होते ?

(अ) तीस वर्षानंतर (आ) वीस वर्षानंतर

(इ) दहा वर्षानंतर (ई) यापैकी नाही

(6) वीणा मंदारकडे कशाचे ॲग्रीमेंट मागते ?

(अ) घराचे (आ) जागेचे

(इ) फॅक्ट्रीचे (ई) वृद्धाश्रमाचे

(7) आई केव्हा रिटायर होणार असते ?

(अ) दोन महिन्याने (आ) एक महिन्याने

(इ) तीन महिन्याने (ई) यापैकी नाही

(8) आदिवासी म्हणजे लढण्यासाठी कोणाला मिळालेले हत्यार आहे ?

(अ) नक्षल्यांना (आ) राजकारण्यांना

(इ) आदिवासींना (ई) लोकांना

(9) 'मानूस' या कवितेचे कवी कोण ?

(अ) यशवंत मनोहर (आ) कल्पना दुधाळ

(इ) विठ्ठल वाघ (ई) दि.पु. चित्रे

(10) कवीचे प्राण कोठे गुंतले ?

(अ) वनात (आ) घरात

(इ) रानात (ई) ध्यानात

(11) 'तडफड' या कवितेचे कवी कोण ?

(अ) ना.धो. महानोर (आ) यशवंत मनोहर

(इ) विठ्ठल वाघ (ई) सुरेश भट

(12) 'एवढे दे पांडुरंगा !' या कवितेचे कवी :

(अ) संत तुकाराम (आ) सुरेश भट

(इ) दि.पु. चित्रे (ई) ना.धो. महानोर

(13) 'निवडुंगाला आलेली फुलं' हा काव्यसंग्रह :

(अ) कल्पना दुधाल यांचा (आ) विठ्ठल वाघांचा

(इ) प्रभू राजगडकरांचा (ई) ना.धो. महानोरांचा

(14) सुरेश भट यांनी कोणत्या रचनाप्रकारात विपुल कविता लिहिली ?

(अ) गझल (आ) भारूड

(इ) मुक्तछंद (ई) लावणी

(15) 'धग असतेच आसपास' हा काव्यसंग्रह :

(अ) सुरेश भट (आ) यशवंत मनोहर

(इ) कल्पना दुधाल (ई) विठ्ठल वाघ

(16) ह्या नभाने ह्या भुईला काय द्यावे ?

(अ) दान (आ) वरदान

(इ) मान (ई) धन 16

139 139 139 139 139